गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ८२ वा ● सोमवार ०७ ऑगस्ट २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 82 | Date : 07/08/2023 | blow : Manday | Page 4 | Price 4

# केंद्रीय सहकारी संस्था निबंधक कार्यालयाच्या डिजीटल पोर्टलचे केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते उद्घाटन

## महाराष्ट्राच्या विकासात सहकार क्षेत्राचे मोठे योगदान : मुख्यमंत्री




पुणे : छोटया स्वरुपातील गुंतवणूकीच्या आधारे मोठे कार्य उभारण्याचे काम सहकाराच्या माध्यमातून झाले असून गरीबांचे प्रगतीचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम सहकार क्षेत्राने केले, असे प्रतिपादन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी केंद्रीय सहकारी संस्था निबंधक कार्यालयाच्या डिजीटल पोर्टलच्या उद्घाटन कार्यक्रमात केले. डिजिटल पोर्टलचा सर्वाधिक लाभ देशात सर्वात जास्त बहुराज्य सहकारी संस्था असलेल्या महाराष्ट्राला होईल, असेही श्री. शाह यावेळी म्हणाले.

चिंचवड येथे आयोजित या कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री बी. एल. वर्मा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार,महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील,पालकमंत्री मंत्री चंद्रकांतदादा पाटील, केंद्रीय सहकार सचिव ज्ञानेश कुमार, विशेष सचिव तथा केंद्रीय निबंधक विजय कुमार, राज्याचे सहकार विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार आदी उपस्थित होते.


महाराष्ट्राचा 'देशाच्या सहकार क्षेत्राची राजधानी' असा उल्लेख करुन श्री. शाह म्हणाले, महाराष्ट्रातूनच सहकाराचे संस्कार देशात पोहोचले. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, धनंजय गाडगीळ, वैकुंठभाई मेहता अनेकांनी सहकार क्षेत्राला पुढे नेले. गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक या राज्यात सहकार क्षेत्राने चांगली प्रगती केली आहे. म्हणूनच केंद्रीय निबंधक कार्यालयाच्या डिजीटायझेशनच्या कार्यक्रमाचा शुभारंभ पुणे येथून करण्यात येत आहे. बहुराज्य सहकारी संस्थांचे कामकाज पाहणाऱ्या केंद्रीय सहकार निबंधकाचे कामकाज पूर्णत: डिजीटल होत आहे. संस्थांना आपल्या कार्यालयातूनच निबंधक कार्यालयाशी संपर्क साधता येणार आहे. सहकारी संस्थांशी संबंधित सर्व कामकाज लक्षात घेऊन हे पोर्टल बनविण्यात आले आहे.

सहकारात छोट्या गुंतवणुकीतून मोठे उद्योग उभे राहिले. १०० रुपये गुंतवणूक करणाऱ्या ३६ लाख महिलांच्या गुंतवणूकीमुळे ६० हजार कोटी लाभ मिळवणारी अमूल सारखी संस्था उभी राहिली आहे. सहकाराचा अर्थ छोटी गुंतवणूक करणाऱ्यांना एकत्र करून मोठा उद्योग स्थापित करणे आहे. लहान लहान व्यक्तीला आपले जीवन उन्नत करण्याची संधी देणे, देशाच्या आर्थिक प्रगतीत योगदान देण्यासाठी त्याला एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि सहकाराच्या माध्यमातून त्याच्या जीवनाचा उद्धार करणे हीच 'सहकारातून समृद्धी' आहे. यासाठीच दोन वर्षापूर्वी केंद्रामध्ये सहकार मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. नव्याने सुरू करण्यात आलेल्या पोर्टलमुळे १ हजार ५५५ बहुराज्य सहकारी संस्थांना याचा लाभ होईल. यातील सर्वाधिक ४२ टक्के संस्था केवळ महाराष्ट्रातील आहेत. या संस्थांची सर्व । पान २ वर

## पंतप्रधानांच्या हस्ते अमृत भारत स्थानक योजनेचा शुभारंभ

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे देशभरातील ५०८ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाची पायाभरणी केली. यावेळी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णवही उपस्थित होते. ही ५०८ रेल्वे स्थानकं २७ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये पसरलेली आहेत. तर, ४५० हून अधिक रेल्वे स्थानके राज्यांमध्ये आणि सुमारे २० केंद्रशासित प्रदेशांमध्ये पसरलेली आहेत.

कार्यक्रमाला संबोधित करताना



पंतप्रधान म्हणाले, 'जगातील रेल्वेचे जाळे जितके दक्षिण आफ्रिका, युक्रेन, स्वीडन, यूके यांसारख्या देशांमध्ये आहे तितके एकट्या भारताने ९ वर्षात रेल्वे ट्रॅक बांधले आहेत. लोकांचा प्रवास हा सुलभ आणि आनंददायी व्हावा हे देशाचं उद्दिष्ट आहे. या माध्यमातून प्रवाशांना प्लॅटफॉर्मवर बसण्यासाठी उत्तम वेटिंग रूम बनवण्यात येत आहेत. तसेच, हजारो स्थानकांवर मोफत इंटरनेट उपलब्ध करण्यात येतील.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, विकासाच्या ध्येयाकडे वाटचाल करणारा भारत आपल्या अमृत कालावधीच्या सुरुवातीला आहे. आजपासून एक नवा अध्याय सुरू होत आहे. १३०० रेल्वे स्थानकांपैकी ५०८ अमृत भारत स्थानकांचा पुनर्विकास केला जाईल. यावर २५ हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत असं पंतप्रधान म्हणाले.

पंतप्रधान म्हणाले की, ३० वर्षांत पहिल्यांदाच देशात पूर्ण बहुमत असलेलं सरकार स्थापन झालं आहे. जगभरात भारताची विश्वासार्हता वाढली आहे. ते पुढे म्हणाले, 'अमृतकालच्या सुरुवातीला या ऐतिहासिक कार्यासाठी मी रेल्वे मंत्रालयाचे कौतुक करतो आणि सर्व देशबांधवांचे अभिनंदन करतो. आज संपूर्ण जगाची नजर भारतावर आहे. जागतिक स्तरावर भारताची विश्वासार्हता वाढली आहे. जगाचा दृष्टिकोन बदलण्याची दोन मुख्य कारणे आहेत. पहिली गोष्ट म्हणजे भारतातील जनतेने तीन दशकांनंतर पूर्ण बहुमताने सरकार स्थापन केले. पंतप्रधान म्हणाले, 'आपल्या शहरांची ओळख शहराच्या रेल्वे स्थानकांशीही जोडलेली आहे. त्यामुळे या स्थानकांवर जर एखादा परदेशी किंवा भारतीय पर्यटक पोहोचला तर आपल्या शहराचे पहिले चित्र चांगले दिसेल.

पंतप्रधानांनी या दरम्यान विरोधकांवरही हल्लाबोल केला आहे. ते म्हणाले, विरोधी पक्ष जुन्याच पद्धतीवर ठाम आहेत. स्वतः काही करणार नाही आणि काही करू देणार नाही. संसदेच्या नवीन इमारतीला विरोधकांनी विरोध केला. ७० वर्षांत शहिदांचे युद्ध स्मारकही केले नाही, स्टॅच्यू ऑफ युनिटीकडे गेले नाही, असेही पंतप्रधान म्हणाले.

त्यापैकी ५५-५५ उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये, महाराष्ट्रात ४४, बिहारमध्ये ४९, पश्चिम बंगालमध्ये ३७, आसाममध्ये ३२, मध्य प्रदेशमध्ये ३४, पंजाबमध्ये २२, गुजरात आणि तेलंगणामध्ये २१-२१, झारखंडमध्ये २०, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूमधील १८-१८, कर्नाटकातील १३, हरियाणातील १५ आणि उत्तराखंडमधील ३ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. ३ त्रिपुरा आणि हिमाचल प्रदेश, मेघालय आणि नागालँडमधील प्रत्येकी १ आहे. याशिवाय दिल्लीतील ५, चंदीगडमधील ८, जम्मू-काश्मीरमधील ३, पुदुचेरीतील १ रेल्वे स्थानके पुनर्जीवित करण्यात येणार आहेत.

## पुढील चार दिवस पावसाची उघडीप

पुणे: कोकण किनारपट्टी, घाटमाथा आणि विदर्भातील काही ठिकाणांचा अपवाद वगळता राज्यात पुढील चार दिवस पावसाची उघडीप राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहून काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्या शिवाय घाटमाथा आणि विदर्भातील काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज आहे. मात्र, काही अपवाद वगळता राज्यात पुढील चार दिवस पावसाची उघडीप राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. हवामान विभागाने पुढील चार दिवस राज्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा इशारा दिलेला नाही,.

## तब्बल ७ वर्षांनंतर पाकिस्तानी संघ भारतात येणार; वर्ल्डकपसाठी सरकारने दिली परवानगी

नवी दिल्ली : जगभरातील क्रिकेट चाहत्यांना एकदिवसीय विश्वचषकात (वनडे वर्ल्ड कप) भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना पुन्हा एकदा पाहायला मिळणार आहे, हे आता निश्चित झालं आहे. भारतात होणाऱ्या विश्वचषकासाठी पाकिस्तानी संघ पाठवताना ज्या अडचणी येत होत्या, त्या आता दूर झाल्या आहेत. पाकिस्तान सरकारने अखेर विश्वचषकासाठी आपला संघ भारतात पाठवण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे ७ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पाकिस्तानी संघ पुन्हा भारतात येणार आहे. यापूर्वी २०१६ च्या टी-२० विश्वचषकासाठी पाकिस्तानने भारताचा



दौरा केला होता.१४ ऑक्टोबरला एकदिवसीय विश्वचषकात भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होऊ शकतो. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर हा सामना होणार आहे.

पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने रविवारी ६ ऑगस्ट रोजी एक निवेदन जारी करून संघ भारतात पाठवण्याचा निर्णय जाहीर केला. पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, त्यांना खेळ आणि राजकारण यांची सांगड घालायची नाही आणि त्यामुळे २०२३ च्या विश्वचषकासाठी पाकिस्तान संघ भारतात पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. मंत्रालयाने असेही म्हटले आहे की, भारत आणि पाकिस्तानमधील संबंध दोन्ही देशांमधील क्रीडा संबंधित बाबींच्या मार्गावर येऊ नयेत.

विश्वचषकासाठी संघ पाठवण्याबाबत निर्णय घेण्यासाठी पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांनी परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो । पान २ वर

## अखेर चंद्राचं दर्शन झालं..! चांद्रयान-३ यानाने पाठवला पहिला फोटो

नवी दिल्ली : भारतीय अंतराळ संशोधन संस्था खडठज ने चांद्रयान ३ मोहिमेअंतर्गत चंद्राचा पहिला फोटो प्रसिद्ध केला आहे. भारताच्या या तिसऱ्या चंद्र मोहिमेला आलेलं हे पहिलं यश आहे. चांद्रयान ३ ने शनिवारी चंद्राच्या कक्षेत प्रवेश केल्यानंतर ही छायाचित्रं (Chandrayaan 3 Moon Photo) घेतली आहेत. भारताच्या चांद्रयान-३ ने अखेर चंद्राच्या कक्षेत प्रवेश केला आहे. बंगळुरु येथून इस्रोने दिलेल्या कमांडप्रमाणे चांद्रयान-३ ने चंद्राच्या कक्षेत प्रवेश केला आहे आणि चंद्राचे फोटो घेतले आहेत, जे ट्विटर पेजवरुन ।प्रसारित करण्यात आले आहेत.। पान २ वर



## पाकिस्तानमध्ये भीषण रेल्वे अपघात, २० पेक्षा अधिक जणांचा मृत्यू, ८० जण गंभीर जखमी

नवी दिल्ली : पाकिस्तानातील रावळपिंडीला जाणाऱ्या हजारा एक्सप्रेसचे दहा डबे रुळावरुन घसरले आहेत. कराची पासून २७५ किलोमीटर अंतरावर हा भीषण अपघात झाला आहे. या अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की आतापर्यंत या अपघातात २० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. तर जवळपास ८० जण जखमी असल्याचं सांगण्यात येत आहे. मृताची संख्या वाढण्याची शक्यता आहे. पाकिस्तानमधील सिंध प्रांतात हा अपघात झाला आहे. दरम्यान यामध्ये जखमी झालेल्या लोकांना जवळच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तसेच त्यांच्यावर उपचार देखील सुरु असल्याची माहिती स्थानिक वृत्तसंस्थेने दिली आहे. या अपघाताची तीव्रता जास्त जरी असली तरी या । पान २ वर



## विठ्ठल मंदिराच्या ७३ कोटींच्या विकास आराखड्याला लवकरच होणार सुरुवात; मंदिर समितीकडून प्रस्तावित कामांची पाहणी

पंढरपूर/प्रतिनिधीः ज्ञानोबा तुकाराम आदी संतांच्या काळातील म्हणजे, ७०० वर्षांपूर्वीचं विठ्ठल मंदिर कसं असेल? याची सगळ्यांनाच उत्कंठा लागून राहिली असताना आता या ७३ कोटींच्या विकास आराखड्याच्या कामांना लवकरात लवकर सुरुवात केली जाणार असल्याचं मंदिर समितीचे सहाध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितलं. मंदिर समिती सदस्यांनी जी कामं करायची आहेत मंदिरातील त्या त्या जागांची रविवारी (६ ऑगस्ट) पाहणी केली आहे.

या विकास आराखड्यात होत असलेल्या नामदेव महाद्वार, दर्शन व्यवस्था, महालक्ष्मी मंदिरावरील स्लॅब, शनि मंदिराजवळील टेंसाईल आणि मंदिरातील दगडी फ्लोरिंग याबाबत मंदिर समितीने जागेवर जाऊन पाहणी केली. या सर्व गोष्टी मंदिराच्या आर्किटेक्चरला सांगितल्या जाऊन सुचवलेल्या बदलांचा अहवाल येत्या ३ दिवसांत सादर करण्यास सांगण्यात आल्याचं गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितलं. यानंतर बदल केलेल्या आराखड्यावर पुन्हा चर्चा होऊन टेंडरसाठी दिलं जाणार आहे. टेंडर प्रक्रिया



झाल्यावर लवकरात लवकर या कामांना सुरुवात केली जाईल, असं औसेकर यांनी सांगितलं.

सध्याच्या मंदिर समितीची मुदत संपून दोन वर्षं उलटल्याने आता नवीन मंदिर समितीकडून या कामाची सुरुवात व्हावी, अशी वारकऱ्यांची अपेक्षा आहे. या आराखड्यात देवाच्या दर्शनासाठी असणारी आणि भाविकांना मरणप्राय यातना देणारी तासांतासाची रांग हटवण्याबाबत कोणतेच बदल नसल्याने भाविकांना देवाच्या दर्शनासाठी तीच यातायात करावी लागणार आहे. विठ्ठलाचीही तिरुपतीच्या धर्तीवर दर्शन व्यवस्था केल्यास उन्हात पाय भाजत आणि पावसात चिखलातून तासंतास उभं राहणाऱ्या भाविकांना कायमचा दिलासा मिळू शकणार आहे . मात्र सध्याच्या आराखड्यात असे मोठे हॉल बांधून निवाऱ्यात भाविकांची दर्शन रांग नेण्याबाबत कोणतीच व्यवस्था केलेली नाही. आता आराखडा राबवण्याची वेळ आली तरी भाविकांच्या त्रासाची जाणीव कुणालाच नसल्याचं दिसत आहे. किमान एवढे पैसे खर्चून मंदिर विकास आराखडा राबवताना दर्शन रांगेची सुटसुटीत व्यवस्था केल्यास भाविकांना तासंतास पाच-पाच किलोमीटर लांब रांगेत उभं राहायची वेळ येणार नाही.

राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या आराखड्यासाठी विशेष परिश्रम घेतल्याने पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली ७३ कोटी ८० लाख रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला होता. दोन वर्षांपूर्वी । पान २ वर

## * सुविचार *

आधी माणूस वाचा, मग पुस्तक वाचा.

## संपादकीय

### न्यायालयाचा खडा सवाल..

प्रत्येक पावसाळ्यात खड्ड्याचे विदारक वास्तव उघडे पडत असताना प्रशासन मात्र त्यावर कोणतीही ठोस उपाययोजना करायला तयार नाही. पावसाच्या पाण्यामुळे रस्त्यांवरील हायड्रोकार्बन उडून जातो. त्यामुळे रस्त्यांना काही ठिकाणी खड्डे पडतात. पावसाचा जोर अन् कालावधी अधिक असेल तर खड्डे वाढतात, असा खुलासा प्रशासनाकडून केला जातो. असे असेल तर अनेक देशांमध्ये रोज पाऊस पडतो, पण तिथल्या रस्त्यांवर कधीच खड्डे पडत नाहीत, मग आपल्या शहरातील रस्त्यांना इतके खड्डे का? भ्रष्टाचाराला थारा न देणाऱ्या एखाद्या महापालिका आयुक्तांच्या काळात तयार झालेले रस्ते पावसाळ्यातही सुस्थितीत असतात याचा अनुभव काही ठिकाणी येतो. नाशिक महापालिकेत डॉ. प्रवीण गेडाम हे आयुक्त असताना तयार झालेले रस्ते आजही फुटलेले नाहीत. हा न्याय अन्य आयुक्तांना का देता आला नाही? काही रस्त्यांवरुन राजकीय मंडळींचा सातत्याने वावर असल्यामुळे ते सुस्थितीत असतात. कितीही जोरदार पाऊस झाला तरीही या रस्त्यांवर खड्डे पडत नाहीत, मग अन्य रस्ते त्याला अपवाद का ठरतात, असा प्रश्न उपस्थित झाल्यावर या खड्ड्यांमध्येही 'अर्थ' दडला असल्याचे पुढे येते. काही नगरसेवक रस्त्यांच्या डांबरीकरणाचा वारंवार आग्रह धरतात. डांबरीकरणाच्या एकूण रकमेतून दोन टक्के रक्कम ही संबंधित नगरसेवकांना देण्याची प्रथा रुढ आहे. अर्थात त्याला अनेक नगरसेवक अपवादही आहेत. याशिवाय प्रशासकीय अधिकारी, राजकीय पदाधिकारीही हिस्सा काढून घेत असतात. बहुसंख्य ठेकेदारांना प्रत्येक रस्त्यासाठी टेंडरच्या किमतींपैकी ४० ते ५० टक्के रक्कम पालिकेच्या मुखंडांच्या झोळीत टाकावी लागते. अन्यथा वर्क ऑर्डर 'मार्गी' लागत नाही. आज ठेकेदारांचे वर्षभराचे उत्पन्न बघितले तर ते कोटींच्या घरात. रस्त्यांना पडलेले खड्डे बुजवतानाही मलिदा वरपला जात नसेल हे कशावरून? ठेकेदारालाही रस्त्यातून नफा हवा असतो. त्यामुळे मंजूर निधींपैकी निम्म्याहून अधिक रक्कम रस्त्यावर खर्चच होत नाही. आपण ज्या रस्त्यावरून चालतो त्यासाठी पालिका कर आकारते. म्हणजेच आपण रस्त्यावर चालण्याचे पैसे देतो. त्यामुळे हा कररूपी पैसा सत्कारणी लावणे हे प्रशासनाचे आद्यकर्तव्य आहे. रस्ते खराब, तर लोकांनी टोल का द्यायचा? अशी विचारणा करीत सरकारचे धोरण फक्त बिल्डर्स आणि कॉन्ट्रॅक्टर यांना मदत करण्यासाठी आहे का, असा खडा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केला होता

# मेल्यावर सहानभूती दाखवू नका, जिवंतपणी साथ सोबत द्या ..

प्रसिद्ध दिग्दर्शक नितीन देसाई यांनी स्वतःच्या स्टुडिओत आत्महत्या केली. कारण होतं कर्जबाजारी असणं, मग त्यावर इथे अनेकांनी आपले प्रतिसाद मांडले, मत मांडली त्यांच्या शरीराचे शवविच्छेदन दवाखान्यात झाले मात्र त्यांच्या आयुष्याच विच्छेदन इथल्या जानकरांनी केले ते मात्र त्यांच्या सोयीनुसार बरं. त्यांना खूप काळजी होती देसाईची किंवा ते नितीन यांना ओळखत होते परिचित होते म्हणून अजिबात नाही....

आयुष्यात कधी कधी सल्ल्यांची भडीमार नको असते हो तुमच्या,

उपदेशाचे डोसही नकोच असतात ..

मी सोबत आहे तुझ्या हा आश्वासक शब्द देऊ शकाल का सांगा तुम्ही ?

जिवंतपणी कसा जगतोय ह्याच सोयरसुतक नसणाऱ्यांना मेल्यावर मात्र खाट्या म्हशीला पण पाझर का फुटतो

आणि हे वारंवार होतं जेव्हा कोणी ( समाजाच्या नजरेत ) यशस्वी व्यक्तिमत्व जे स्वकष्टाने प्रसिद्धीच्या शिखरावर पोहचले असते न तेव्हा हरते अपयशी होते, आयुष्यात सगळ्यांना बाजुनी घेरल्या जाते तेव्हा माघार घेण्याशिवाय पर्याय राहतं नाही. तेव्हा आत्मसमर्पण शिवाय मार्गही नसतो हो.

तुम्हाला आम्हाला बोलायला काय जातं अस नको होतं करायला? मागच्याचा विचार करायला हवा होता म्हणून. कोण असतं मागे आपल्यासाठी आपण मेल्यावर मरणार? अहो जगण्याचा मोह प्रचंड वाईट असतो आणि त्यातल्या त्यात माणुस हा प्रचंड स्वार्थी प्राणी आहे मी तुझ्या शिवाय जगूच शकतं नाही म्हणणारी रक्ताच्या नात्यातील लोकही दहावा दिवस तेरावा झाला की विसरून जातात चांगले दोन तिन वेळा जेवतात, टॉयलेट ला जातात झोपतात उठतात ऐकून सगळी दैनंदिन काम करतात. मग तुम्ही आम्ही काय लक्षात ठेवणार किंवा आठवण काढणार?

आठवणी फक्त आभास देतात सहवास नाही नक्की कोणाला हवा असतो अपयशी किंवा मानसिकरित्या हरलेल्या माणसाचा सहवास? जेव्हा अपयश येतं तेव्हा लोक टाळतात अक्षरशः..

प्रचंड बदनामी केली येता जगण्यासाठी जी धडपड चालू असते त्यासाठी देखील नाउमेद केलं जातं. मग मेल्यावर हा तात्पुरता दिखावा कोणासाठी स्वतःच्या समाधानासाठी की लोकांना हे दाखवण्यासाठी की तुम्ही किती संवेदनशील माणुसकी संपन्न आहात???

अहो साधा काटा टोचला तरी हळहळ व्यक्त करणारी आपली मानवी जात. स्वतःला संपवण्यापर्यंत जाते म्हणजे त्याची मानसिक अवस्था काय असेल हे त्यालाच माहिती न? म्हणतात आईपण अनुभवण्यासाठी गर्भार राहावं लागतं, प्रसव वेदना अनुभवाव्या लागतात तेव्हाच मातृत्व काय हे कळतं..

अगदी तसच न माणुस आत्महत्या का करतो हे जाणून घेण्यासाठी त्या मानसिक अवस्थेतून जावं लागतं तेव्हाच तुम्हाला यावर बोलण्याचा हक्क आहे...

कोणाशीतही बोलायला हव असतं हे अगदी कॉमन वाक्य प्रत्येक जण झाडत असतो..

आपल्या हृदयावर हात ठेवून प्रामाणिकपणे सांगा बरं तुम्हाला आवडतं का दुसऱ्याच्या अडचणी ऐकायला, त्याची घुसमट, दुःख, वेदना त्याचा मनावरचा ताण हे सगळ तुमच्या साठी



रडगाणं असतं ते आणि हे ऐकवणारी व्यक्ति बोरिंग असते म्हणून तुम्ही यशाचे वाटेकरी असतात फक्त आणि अपयश आल्यावर साथ सोडणारे फटकून वागणारे थोडक्यात रंग बदलणारे हे मान्यच करा ...

एका यशाच्या शिखरावर प्रसिद्धीच्या झोतात जाऊन आलेली व्यक्ती मनमर्जीने आणि स्वबळावर स्वाभिनाने जगणारी असते कारण स्वतःच्य अस्तित्व त्या व्यक्तीने स्वतः निर्माण केलेलं असतं पण त्याच्या आयुष्यातील काही निर्णय चुकतात आणि सर्वच गणितचं चुकत जातात आयुष्यातील आणि यामुळे मात्र मग त्यांचं संपूर्ण विश्वचं बदलून जातं. स्वाभिमानाने जगणारा माणुस जेव्हा अपयश येतं न तेव्हा हतबल आणि लाचार होऊन जातो. आजूबाजूला असणारी गर्दी आपोआपच कमी होतं जाते.. स्थूती सुमने नकळत टोमणे दुषणे याची जागा घेतात.पण मेहनत स्वाभिमान आणि कष्टाची सवय असणारा माणुस शेवटपर्यंत हातपाय हलवतो पण प्रश्न त्याच्या तत्वाचा स्वभामानाचा हतबलतेचा येतो तेव्हा स्वाभिमान शून्य जगण्यापेक्षा तो मरणं जवळ करणं पसंद करतो..

तुम्हाला काय कळणार काटेरी वाटेवरून चालताना पाय रक्तबंबाळ झाले तर पायची लाली बघून हा समाज ज्या हीन नजरेने बघतो ती किती विषारी असते?

पण हिच लाली यशस्वी असताना लक्ष्मीच पाऊलं असते ह्या समाजासाठी ...

माणुस जिवंत असताना साथ देणं.खंबीरपणे सोबत उभ राहणं कोणालाच जमतं नाही मेल्यावर मात्र चुकांचे वाचन केले जाते, कसं वागायला हव होतं याचे सल्ले दिले जातात..

कोणाशी तरी बोलायला हव होतं अशी कोरडी कणव दाखवली जाते..

माणुस जेव्हा अपयशी होतो न तेव्हा त्यांची समाजायेकी किंमत तेवढीच असते जेवढी एका खाट्या गाई म्हशीला, समाजालेखी वांझोट्या बाईला आणि सुकलेल्या झाड्याला असतं थोडक्यात निरूपयोगी..

झाड सुकत तेव्हा पाखर वाटसरू सोडून जातात आणि जळण म्हणून त्याला तोडलं जातं..

गाई म्हैस जेव्हा खाटी होते तेव्हा तिला खाटकाला विकलं जातं..

मग अपयशी माणसाचं काय करणार?

आजची सुखात यशात किंवा प्रसिद्धीच्या शिखरावर असताना हा कोणीतरी नातेवाईक जवळचा मित्र आहे म्हणून ओढून ताणून ओळख सांगणारी लोक ह्यांना फक्त मौज मजा औटिंग पार्ट्या मोठं मोठे समारंभ टिंगलटवाळी पाहिजे असते... तेव्हा माणुस जेव्हा अपयशी होतो तेव्हा हीच रंग बदलतात..

तो कर्जबाजारी आहे बरं जपून रहा मी जवळून ओळखतो त्याला.. ही असतात आपल्याला जवळून ओळखणारी लोक जी आपल्याला मिळणारी आर्थिक मदत मिळू देत नाही.. चुकून कोणी दिलीच साथ तर आपल्या सोबत उभे राहु देत नाही...

तो हरलेला आहे कसें परत करणार तुझे पैसे म्हणून इतरांना सावध करणारी लोक आपल्या जवळच्या व्यक्तीला मात्र आर्थिक भोवऱ्यातून बाहेर पडू देत नाहीत उलट त्यापासून अलिप्त राहून संबंध तोडून त्याला अजून दलदलीत लोटतात..

जिवंतपणी मदत केली असती तर तो ह्या टोकाच्या भूमिकेपर्यंत गेलाच नसता हे माहिती असणारी लोक हातचा राखून राहणारी लोक मात्र तो मेल्यावर त्याच्यावर स्थूती सुमने उधळतात तो किती मेहनती होता, त्याचा स्वभाव किती चांगला होता म्हणून हळहळ व्यक्त करतात ती कोणत्या तोंडाने आणि भावनेने?

ह्याच मन ह्यांना खात नाही कां? आंतरमनाची लाज विकलेली असते असल्या भावना शून्य लोकांनी...

बरं ज्यांनी मदत केलेली असते चुकून, चुकून हा जेव्हा त्यांना कळतं की हा आता पूर्णपणे हरला आहे आपला परतावा मिळणं मुश्किल आहे ते तर अक्षरशः जिवंतपणी मरणं यातना येतात इतका मानसिक छळ करतात..

ज्यांना माहिती असतं की हा ह्यातून बाहेर पडल्यावर आपले पैसे ठेवणार नाही तरीही अपयश आल्यावर विश्वास कमी पडतो...आणि मनातील जागा कमी होऊन अंतर पडते अगदी वसुली करायची म्हणून संबंध असतात मग तुम्हाला काय हक्क आहे त्याला वाहायचा?

अनेकांच्या आत्महत्या मनाला चटका लावून जाणाऱ्या असतात हे खरंय पण त्याची माणुसकी,चांगुलपणा सगळं मेल्यावर का आठवत??

सल्याचा भडीमार, उपदेशाची लाट मेल्यावरच का येते. जिवंतपणी साळसूदपणे विसरून जातात ह्यागोष्टी मग मेल्यावर त्याची किंमत कळते का???

काय करता येईल न ते जिवंतपणीचं करा मेल्यावर फक्त आठवणी आणि हळहळ पश्चाताप राहतो, काहीतरी करू शकलो असतो ही गिल्ट मनात राहते. कदाचित त्रास नसता दिला सहकार्य केले असते मागे बदनामी केली नसते तर त्याच्या शरीराचे शववीच्छेदन करण्याची वेळ आली नसती आणि आपल्याला त्याच्या स्वभावाचे आयुष्याचे विच्छेदन करण्याची...

द्यायची असेलचं तर जिवंतपणी साथ द्या निःस्वार्थ सोबत रहा दुप्पट परतावा मिळेल प्रेमाचा विश्वासाचा आणि अर्ध्या रात्री धावून येणाऱ्या जिवलगाचा..

एकवेळ कोणाच्या अंतविधीला जाऊ नका पण आपल्या म्हणणाऱ्या माणसाची माती होतं असताना तो तुमच्या डोळ्यासमोर तीळ तीळ मरत असतानाचं त्याला गरज असते तुमच्या सोबतीची साथीची जमलं तर तिचं द्या..बघा जमतंय का नाही तर ही साखळी चालतं राहणार आणि तुमची कोरडी कणव दाखवण्याची नौटंकी पण... असो...नितीन देसाई यांना भावपुर्ण श्रद्धांजली ईश्वर त्यांच्या आत्मास मरणोत्तर तरी शांती देवो...

**– प्रसाद मोटे,**
**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद),**
**मो.९१३०८१२६६४**

पान १ वरुन

### केंद्रीय सहकारी संस्था निबंधक ..

कामे पोर्टलद्वारे होतील.

पुढील टप्प्यात विविध राज्यातील ८ लाख सहकारी संस्थांचे संगणकीकरणही करण्यात येणार आहे. त्यामुळे कामकाजात गती येईल. पारदर्शकता, जबाबदारीचे तत्व आणि आधुनिकतेच्या आधारे सहकार चळवळ पुढे जाईल. पारदर्शकता वाढवून जबाबदारी निश्चित केल्यास समाजाच्या सर्व घटकांना सहकाराशी जोडता येईल. सहकारी संस्थांच्या क्षमतांचा उपयोग करून विकासाला गती देण्याचे कार्य करावे लागेल. बहुराज्य सहकारी संस्था कायद्यात सहकार क्षेत्राच्यादृष्टीने अनेक चांगल्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पारदर्शकतेसह संस्थांची कार्यक्षमताही वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. युवकांना सहकार चळवळीशी जोडल्यास सहकार क्षेत्राचा वेगाने विकास होईल, असेही ते म्हणाले.

नैसर्गिक शेती करण्यासाठी अनेक शेतकरी पुढे येत आहे. त्यांना आपल्या उत्पादनाचे मूल्य मिळत नाही. त्यांच्यासाठी बहुराज्य सहकारी संस्था उभारण्यात येईल. ही संस्था नैसर्गिक उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना सोबत घेण्यासोबत 'भारत' ब्रँण्डच्या माध्यमातून उत्पादनाचे मार्केटींग करून त्याचा फायदा शेतकऱ्याच्या खात्यात पाठविण्याचे काम होईल. शेतकरी आपल्या चांगल्या उत्पादनांना निर्यात करू शकतील. बहुराज्यीय निर्यात समिती शेतकऱ्यांकडून उत्पादन खरेदी करून त्याचे निर्यात करेल आणि त्याचा लाभ शेतकऱ्यांच्या खात्यात जाईल.

महाराष्ट्राच्या विकासात सहकार क्षेत्राचे मोठे योगदान आहे, असे सांगून मुख्यमंत्री एकनाश शिंदे म्हणाले, विशेषत: पश्चिम महाराष्ट्राच्या विकासात सहकार क्षेत्राचे योगदान मोठे आहे. राज्यात २ लाख २० हजार सहकारी संस्था असून ६०० पेक्षा अधिक बहुराज्य संस्था आणि सोसायट्या कार्यरत आहेत. केंद्र शासनाचे नवे पोर्टल सहकार क्षेत्राच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरेल.ते पुढे म्हणाले, केंद्राच्या सहकार विभागाने अनेक महत्वाचे निर्णय घेतले आहेत. केंद्र सरकार सहकार क्षेत्राच्या विकासाकडे अत्यंत सकारात्मकतेने लक्ष देत आहे. नव्या पोर्टलमुळे नोंदणीची स्थिती, नोंदणी, आदेश, सोसायटीचे प्रमाणपत्र, विवरण सामान्य शेतकऱ्यांना उपलब्ध होतील.

राज्यात सहकारी संस्थांमध्ये ५ कोटी २८ लाख सदस्य आहेत. सहकारी बँकेमधील ठेवी २ लाख ३१ हजार कोटीपेक्षा जास्त आणि खेळते भांडवल साडेचार लाख कोटींपेक्षा जास्त आहेत. या चळवळींचा मोठा आधार प्राथमिक कृषी सहकारी संस्था (पॅक्स) आहेत. देशातील सर्वाधिक २१ हजार पॅक्स महाराष्ट्रात आहेत ही अभिमानास्पद बाब आहे. या संस्थांना बळकटी देण्याचे कार्य केंद्राच्या सहकार मंत्रालयाने केले आहे.

शेतकऱ्यांला केंद्र बिंदू मानून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे कार्य केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी सहकार मंत्रालयाच्या माध्यमातून केले. सहकार क्षेत्र कठीण काळातून जात असतांना 'सहकार से समृद्धी' या उद्देशाने सहकार विभागात अनेक सकारात्मक बदल करण्यात येत आहेत. सहकार क्षेत्रात पारदर्शकता येत आहे. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचा १० हजार कोटी रुपयांचा आयकर माफ करण्याचा मोठा निर्णय घेऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे कार्य त्यांनी केले. यामुळे साखर उद्योगालाही नवसंजीवनी मिळाली आहे. यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. पॅक्सच्या संगणकीकरणामुळे राज्यातील १२ हजार सहकारी संस्थांना याचा फायदा होईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, केंद्राच्या आणि राज्य शासनाच्या योजनांचे एकत्रिकरण करुन राज्यात सहकारी संस्थांच्या विकासाला चालना देण्यात येईल. महाराष्ट्राने जागतिक बँकेच्या सहकार्याने स्मार्ट प्रकल्प सुरू केला आहे. १० हजार गावात पॅक्सला कृषी व्यवसाय संस्थात परिवर्तीत करण्यात येत आहे. त्यांना प्रशिक्षण देऊन, वितरण साखळीचा भाग करून सक्षम करण्याचा प्रयत्न आहे. महात्मा गांधी तसेच संत तुकडोजी महाराजांच्या ग्रामस्वराज्याचे स्वप्न यामुळे साकार होईल. या माध्यमातून देशात पहिले बहुउद्देशीय कृषी व्यवसाय संस्थेचे आदर्श प्रारूप महाराष्ट्रात तयार होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात सहकाराची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि त्यानंतर देशात. सर्वाधिक ग्रामपातळीपर्यंत सहकार महाराष्ट्रात पोहोचला. सहकारातून समृद्धी येऊ शकते अशी व्यवस्था महाराष्ट्राने उभी केली. त्यातून मोठे सहकारक्षेत्र महाराष्ट्रात निर्माण झाले. याचमुळे केंद्राने सहकार क्षेत्रासाठी नवा कायदा केला आणि कायद्याच्या अंतर्गत गावपातळीवर सहकार नेण्यासाठी व्यवस्था उभी केली. ही व्यवस्था डिजिटल पोर्टलच्या माध्यमातून सुलभतेने सर्वांना उपलब्ध करून देण्यासाठी आधुनिक, सुलभ पोर्टल तयार केले. या पोर्टलचे उद्घाटन सहकार पंढरी असलेल्या महाराष्ट्रात होत आहे.

केंद्रात सहकार मंत्रालय स्थापन झाल्यानंतर शेतकऱ्यांना जास्त पैसे दिले म्हणून साखर कारखान्यांना आयकर लावण्याचे धोरण मंत्री अमित शाह यांनी बदलले आणि खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम केले. स्वत: सहकार क्षेत्रात चांगले काम केले असल्याने या क्षेत्राविषयी त्यांना तंतोतंत माहिती असल्याने वर्षानुवर्षे रखडलेला प्रश्न त्यांनी सोडविला. एनसीडीसीच्या माध्यमातून साखर कारखान्यांना मदत करण्याचे आणि साखर उद्योगाच्या संदर्भातील चांगले निर्णय घेतले. सहकार विभागाची संवेदनशीलता यानिमित्ताने बघायला मिळाली, असेही ते म्हणाले.

सहकारी संस्थेला मजबूत करण्याचा कार्यक्रम केंद्र सरकारने हाती घेतला आहे.नवीन कायद्याच्या माध्यमातून बहुराज्य सहकारी संस्थांना पारदर्शक कारभाराला मदत होणार आहे. सामान्य माणसाचा पैसा बुडणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे. गावापर्यंत समृद्धी पोहोचण्यासाठी सहकार क्षेत्र मजबूत होणे आवश्यक आहे, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, साखर उद्योग आयकर संदर्भातील समस्येचा गेल्या २२ वर्षात सामना करत होते. यामुळे सहकारी साखर कारखाने बंद होण्याची शक्यता होती. राज्यातील कारखान्यांना वारंवार आयकर विभागाच्या नोटीसा येत होत्या. केंद्र सरकारने सहकार क्षेत्राला पुढे नेण्यासाठी सहकार विभागाची स्थापना केल्यानंतर ऊस उत्पादक आणि साखर कारखान्यांना समस्येपासून सोडविण्यासाठी अमित शाह यांनी आयकराचा हा प्रश्न सोडविल्याने साखर उद्योगाला मोठा दिलासा मिळाला आहे, असेही त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, 'सहकारातून समृद्धी' या प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठी सहकार मंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार क्षेत्रात अनेक चांगले बदल होत आहेत. सहकार क्षेत्रातील सदस्यांच्या सहमतीने देशाचे व्यापक हीत लक्षात घेऊन हे बदल करण्यात येत आहेत. देशाच्या सहकाराचा १२० वर्षाचा इतिहास आहे. या कालावधीत सहकार ग्रामीण भागातील घराघरात पोहोचला आहे.सहकाराने ग्रामीण भागाच्या विकासात योगदान दिले आहे. प्रथमच केंद्र स्तरावर सहकार मंत्रालयाची स्थापना करण्याचा निर्णय होणे स्वागतार्ह आहे. सहकार मंत्रालयाच्या प्रत्येक प्रयत्नांना राज्याची साथ राहील. सहकाराच्या क्षेत्रात महाराष्ट्र आणि गुजरातची चांगली कामगिरी झाली आहे. बहुराज्य सहकारी संस्थांसाठी तयार करण्यात आलेल्या पोर्टल उपयुक्त ठरेल आणि सहकार क्षेत्रातील समस्या दूर होण्यास मदत होईल. सहकार क्षेत्र विश्वासाने पुढे जाईल आणि नागरिकांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विशेष सचिव श्री. विजय कुमार प्रास्ताविक भाषणात म्हणाले, बहुराज्य सहकारी संस्थांसाठी आजचा कार्यक्रम महत्वाचा आहे. बऱ्याच दिवसापासून प्रलंबित बहुराज्य सहकारी संस्था कायदा (एमएससीएस क्ट) हा २ ऑगस्टपासून लागू झाला आहे. या अधिनियमाशी निगडीत नियम ४ ऑगस्टपासून लागू करण्यात आले असून आज त्याविषयीच्या पोर्टलचे उद्घाटन करण्यात येत आहे. यामुळे बहुराज्यीय सहकारी संस्थांचे कामकाज अधिक सुरळीत होईल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी राष्ट्रीय साखर महासंघाच्या वतीने सहकार मंत्री अमित शाह यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच या डिजिटल पोर्टल साठी योगदान दिलेल्या विद्यार्थ्यांनाही मंत्रिमहोदयांच्या हस्ते विशेष प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास सहकार क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अखेर चंद्राचं दर्शन झालं..!

शनिवारी संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास चांद्रयान-३ चंद्राच्या कक्षेत प्रवेश करण्याची प्रक्रिया सुरु झाली आणि ती यशस्वी झाल्याचं इस्रोने म्हटलं आहे. त्यामुळे आता चांद्रयान-३ चा चंद्राच्या भूमीवर लँड होण्याचा प्रवास सुरु झाला आहे. आता २३ ऑगस्ट रोजी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर चांद्रयान सॉफ्ट लँडिंगचा प्रयत्न करणार आहे. हा प्रयत्न जर यशस्वी झाला तर अमेरिका, रशिया, चीननंतर भारत हा चंद्रावर पोहोचणारा चौथा देश ठरणार आहे. चंद्रयान-३ १४ जुलै रोजी श्रीहरीकोटा येथून अवकाशात झेपावलं आहे.

### विठ्ठल मंदिराच्या ७३ कोटींच्या विकास

अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यासाठी ७३ कोटी ८० लाखांची तरतूद केली होती. मात्र यानंतर राज्यात सत्ताबदल झाल्यावर काही अधिकाऱ्यांनी नव्याने दुसऱ्या आर्किटेक्चरकडून पुन्हा नव्याने आराखड्याचे काम सुरु केल्याने हा प्रकल्प रेंगाळला होता.विठुरायाच्या बाबतीत नाही घडविला, नाही बैसविला ही मान्यता वारकरी संप्रदायाची आहे. विठ्ठल मंदिर हे अकराव्या शतकातील असल्याचं अभ्यासक मानत असले तरी त्याहीपूर्वीपासून विठुरायाचं हे मंदिर अस्तित्वात असल्याचं काही अभ्यासकांचं मत आहे. आता पुन्हा ७०० वर्षांपूर्वीच्या मूळ मंदिराप्रमाणे या मंदिराला रूप देण्यासाठी हा आराखडा पुरातत्व विभागाच्या सूचनेनुसार बनवण्यात आला आहे.

### तब्बल ७ वर्षांनंतर पाकिस्तानी

झरदारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली होती. यात सरकारचे इतर अनेक मंत्रीही होते. या आठवड्याच्या सुरुवातीला समितीची बैठक झाली, ज्यामध्ये भुट्टो यांच्यासह बहुतांश मंत्र्यांनी संघ भारतात पाठवण्यास पाठिंबा दिला. त्यानंतरच सरकारने टीम पाठवण्याचा निर्णय घेतला.

### पाकिस्तानमध्ये भीषण रेल्व..

अपघातामगाचं नेमंक कारण अद्याप अस्पष्टच आहे. पाकिस्तानचे रेल्वेमंत्री ख्वाजा साद रफीक यांनी हा अपघात कोणीतरी मुद्दाम घडवून आणल्याचा दावा पत्रकार परिषदेमध्ये केला आहे. तसेच त्यांनी तांत्रिक बिघाडामुळेही हा अपघात झाला असल्याची शक्यता वर्तवली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble



## दाभोळ येथील घटनेचा नळदुर्ग येथे नाभिक समाजाच्या वतीने जाहीर निषेध !!

वागदरी/एस.के.गायकवाड : रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील ओमळी या गावातील नाभिक समाजातील कु. निलिमा सुधाकर चव्हाण ही दापोली येथील बँक ऑफ इंडिया या आपल्या कामावरून घरी सुट्टीवर जात असताना तिची निर्घृणपणे हत्या करुन दाभोळ येथील खाडीत तिचा मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत फेकून दिला. या घटनेच्या निषेधार्थ नळदुर्ग,अणदूर व जळकोट येथील नाभिक समाज बांधवांच्या वतीने नळदुर्ग पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक स्वप्निल लोखंडे यांना निवेदन देऊन सदर निंदनीय घटनेचा जाहीर निषेध करुन त्या नराधमास फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी नळदुर्ग शहर नाभिक समाज संघटनेचे अध्यक्ष अध्यक्ष संदीप सुरवसे,अणदूर नाभिक संघटनेचे अध्यक्ष अमोल महाबोले,जळकोट नाभिक समाज अध्यक्ष विश्वनाथ सुरवसे,उपाध्यक्ष नेताजी महाबोले,सचिव महादेव माने,समीर सुरवसे,संतोष महाबोले,हानमंत हिल्लाल, राम सोमवसे,मधुकर भुरे अनिल महाबोले,सुधाकर भुरे,लखन महाबोले,मंगेश सुरवसे,बालाजी सुरवसे, राजेंद्र विभुते,अंबादास क्षीरसागर,राजेंद्र मोरे,किशोर पवार,अंकुश भुरे,प्रशांत सोमवसे,गोविंद गवळी,सिधदु सुरवसे,परमेश्वर सुरवसे, सुदर्शन सोमवसे,पंडित माने गोवर्धन आतकरे,सुमित महाबोले,सोमनाथ महाबोले, बाबा काळे,विशाल सुरवसे, दामोदर सोमवसे,सचिन सुरवसे'स्वप्नील भुरे,रामेश्वर भुरे,रवी सोमवसे,अजय सुरवसे,अभिजीत महाबोले,भिम आतकरे लक्ष्मण सोमवसे आदी समाज बांधव उपस्थित होते.

## पंढरपूर रेल्वे स्थानकाच्या नूतनीकरण कामाचा शुभारंभ

### चाळीस कोटी रुपये खर्चून स्टेशनचा होणार कायापालट

पंढरपूर/प्रतिनिधी : अमृत भारत स्टेशन अंतर्गत पंढरपूर रेल्वे स्थानकाच्या नूतनीकरणाच्या भूमिपूजन सोहळा आज संपन्न झाला. यावेळी दिल्लीतून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव हे आभासी पद्धतीने उपस्थित होते. अमृत भारत स्टेशन अंतर्गत जिल्ह्यातील पंढरपूर, सोलापूर , कुर्डुवाडी आणि दुधनी अशा चार रेल्वे स्थानकाच्या नूतनीकरणासाठी सुमारे १४१ कोटी रुपयांचा निधी खर्च होणार आहे. या रेल्वे स्टेशनच्या नुतनीकरणातून स्टेशनचा कायापालट होऊन पंचतारांकित व्यवस्था सामान्य प्रवाशाला मिळतील.

या कार्यक्रमास विधानसभेचे माजी अध्यक्ष तथा आमदार हरिभाऊ बागडे, आमदार समाधान अवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, संत शिरोमणी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे, प्रांताधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, मुख्याधिकारी अरविंद माळी, रेल्वेचे वरिष्ठ मंडळ यांत्रिकी अभियंता राहुल गर्ग, मुख्य वाणिज्य निरीक्षक एच व्ही चांगण, ए डी एन जनार्दन प्रसाद, मुख्य पर्यवेक्षक रमेश काळे, स्टेशन प्रबंधक चनगौडर, रेल्वे पोलीस निरीक्षक जाधव आदींसह मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थित होते. अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत पंढरपूर रेल्वे स्थानकाच्या नूतनीकरणाच्या कामाचे भूमिपूजन शनिवारी संपन्न झाले. पंढरपूर रेल्वे स्थानकासाठी सुमारे ४० कोटी रुपयांचा निधी खर्च होणार आहे.या रेल्वे स्टेशनच्या नुतनीकरणातून स्टेशनचा कायापालट होऊन पंचतारांकित व्यवस्था सामान्य प्रवाशाला मिळतील. यातून भविष्यात



व्यापार वृद्धी देखील होताना पाहायला मिळेल.

यावेळी आमदार समाधान अवताडे म्हणाले, पंढरपूर हे तीर्थक्षेत्र असल्याने मागील ९ वर्षात ७ राष्ट्रीय महामार्गाशी जोडले गेले आहे. आता रेल्वे स्थानकाच्या नूतनीकरणानंतर ते देशपातळीवर जाईल. रेल्वे आणि रस्ते विकास झाल्यामुळे पंढरपूरच्या विकासाला चालना मिळाली असून याचा लाभ भाविकांसह शेतकऱ्यांनाही होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून पंढरपूर हे देशपातळीवर एक तीर्थक्षेत्र म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न सुरु आहे. नॅरोगेज ते इलेकट्रीक ब्रॉडगेज असा रेल्वेचा विकास झाल्याने पंढरपूरच्या विकासात मोठी भर पडली असल्याचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी सांगितले.

रेल्वे स्थानकाच्या विकास होत असताना येथे येणाऱ्या प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन त्यांची ये- जा सुखकर व्हावी, शहरातील वाहतुकीवर ताण येऊ नये यासाठी रेल्वेने आपल्या हद्दीतील स्टेशन ते भाई राऊळ पुतळा या दरम्यान सध्या अस्तित्वात असलेला रस्ता दुरुस्त करुन प्रवासी आणि स्टेशनकडे येणाऱ्या वाहनांसाठी उपलब्ध करून द्यावा अशी मागणीही माजी आमदार परिचारक यांनी केली. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन रमेश काळे यांनी केले.

## गॅस कटरच्या साह्याने आयडीबी बँकच्या एटीएम मशीनवर दरोडा

करमाळा/प्रतिनिधी :करमाळा शहर हद्दीतील देवीचा माळ रस्त्यालगत असलेली आयडीबीआय बँकेच्या एटीएम मध्ये पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी धाडसी चोरी केली आहे सकाळी फिरण्यासाठी जात असलेल्या लोकांची भीतीही त्यांना वाटली नाही एवढी धाडशी चोरी पहाटे झाल्यानंतर आता बँकेच्या एटीएम बाबत सर्वत्र सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला आहे अतिशय रहदारी असलेला या परिसरामध्ये पहाटे १० मिनिटांच्या कालावधीत सदरच्या चोरीत हात साफ केला आहे अचानक एक मोठी काळी गाडी बँके समोर उभा राहते त्यातून




तीन ते चार लोक उतरतात गॅस कटरच्या साह्याने एटीएम ला उभे फाडून त्यातून लाखो रुपयांची रक्कम घेऊन पसार होतात दरम्यान बँकेच्या सीसीटीव्ही वर काळा रंग असलेला स्प्रे टाकून निघून जातात या सर्व प्रकारात केवळ दहा मिनिटांचा कालावधी जातो यापूर्वीही असे प्रकार आणि गावांमध्ये घडलेले असताना करमाळयात मात्र कोणत्याही एटीएम मध्ये एकही सुरक्षा रक्षक नसतो किंवा इतर कोणत्याही प्रकारची सुरक्षा असावी असे नियोजन करण्यात आले नसते नेमकी किती रक्कम गेली याबाबत अद्याप स्पष्टता नसली तरी यामध्ये १३ लाख ६५ हजार रक्कम गेली असण्याची शक्यता आहे घटनास्थळी करमाळा पोलिस निरीक्षक जोत्तीराम गुंजवटे हे पथकासह दाखल झाले होते व वेगवेगळ्या ठिकाणी पथकं सह तपास सुरू करण्यात आला आहे

## नळदुर्ग येथील शिवनेरी बंगला सावकाराच्या तावडीतून मुक्त

### सावकारकीला न्यायालयने दणका दिल्याने एकच खळबळ

वागदरी/एस.के.गायकवाड : नळदुर्ग ता.तुळजापूर येथील एका घर मालकाचा बंगाल एका सावकाराच्या तावडीत आडकला होता.तो बंगला सावकार हाडप करण्याचा डाव होता परंतु बंगला मालकाने सदर प्रकरण सावरकराचे निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था उस्मानाबाद यांच्या कडे आपल्याला आपला बंगला परत मिळावा म्हणून रितसर दावा केला असता सावकराचे उपनिबंधक यांनी सदर बंगला मुळ मालकाला परत करण्याचा आदेश दिल्याने नळदुर्ग,जळकोट परिसरात एकच खळबळ उडाली असून सावरकरकी करणाऱ्या सावकारांचे धाबे दणाणले आहेत.




याबाबत सविस्तर व्रत असे की अशोक नारायण जाधव रा.बाभळगाव ता.तुळजापूर यांच्या ताब्यातील व्यंकटेश नगर नळदुर्ग ता.तुळजापूर येथील बंगला (राहते घर)त्यांनी आर्थिक आडणीमुळे जळकोट ता.तुळजापूर येथील सावकार महावीर कुशाबा कदम यांच्या कडून रुपये दोन लाख घेवुन त्या बदलल्यात पैशास तारण म्हणून दि.१२ जुलै २०११ रोजी मा.दुय्यम निबंधक सहकारी संस्था तुळजापूर यांच्या कार्यालयात त्यांच्या ताब्यात असलेला न.प.हद्दीतील बंगाल पोकळ खरेदी दस्ता अधारे खरेदी देवून तारण म्हणून दिले व रक्कम रुपये एक लाख साठ हजार सावरकर महावीर कदम यांच्या कडून घेतले.त्याचा खरेदी दस्त क्रमांक २१५६/२०११ असा आहे.या व्यवहारातील उर्वरित रक्कम ४०,००० हजार जळकोट येथे बंगाल मालक अशोक जाधव यांना देत असताना कोऱ्या दस्तऐवजावर सावकाराने त्यांच्या सह्या घेतल्या पैशाची गरज असल्याने विश्वास ठेवून अशोक जाधव यांनी सह्या केल्या.व्याजाच्या बदल्यात बंगल्यात भाडेकरू ठेवून वेळच्या वेळी भाडेकरूच्या रक्कमून व्याजाची रक्कम सावकाराने वसुल केली आहे.नंतर चारपाच वर्षानी पैशाची तरतूद करून दि.२६ मार्च २०१७ रोजी घर मालक अशोक जाधव हे आपला बंगला परत मागण्यांसाठी गेले असता सावकाराने वेळच्या वेळी व्याजाची रक्कम घेवून देखील घर मालक अशोक जाधव यांच्या कडे दोन लाखाच्या बदल्यात व्याजासकट आठ लाखा रुपयांची मागणी केली असता घर मालक अशोक जाधव यांनी सावकारांचे निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था उस्मानाबाद यांच्या कडे सदर प्रकरणी रितसर तक्रार दिली.

सदर प्रकरणी अशोक जाधव यांचे वकील अँड.एन.व्ही.कदम (जळकोटकर)व अँड.औदुत एन.कदम (जळकोटकर) यांनी भरभक्कम पुरावे सादर करून केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून सावकारांचे निबंधक सुनील शिरापूरकर यांनी सदर बंगला हा मूळ मालक अशोक जाधव याना परत करण्याचा आदेश दिला.त्यामुळे नळदुर्ग व परिसरात एकच खळबळ उडाली असून सावकारांचे धाबे दणाणले आहेत. सदर प्रकरणी योग्य न्याय मिळवून दिल्या बदल अँड.एन.व्ही.कदम यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## घोसरवाड कन्या विद्या मंदिर येथे श्री गुरुदत्त शुगर्स कडून वह्या वाटप

शिरोळ/नामदेव निर्मळे: घोसरवाड तालुका शिरोळ येथील जिल्हा परिषद कुमार विद्या मंदिर, उर्दू शाळा, वाकी गोल मराठी शाळा, हायस्कूल शाळा, प्राथमिक व माध्यमिक शाळा,येथे श्री गुरुदत्त शुगर्स लि. टाकळीवाडी कडुन वही वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सामाजिक कार्याचा वसा घेतलेले श्री गुरुदत्त शुगर्स नेहमी सामाजिक बांधिलकी जपत आलेली आहे.

श्री गुरुदत्त शुगर्स लिमिटेड टाकळीवाडी चेअरमन मा. माधवराव घाटगे साहेब व एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर मा.राहुल घाटगे साहेब यांचे शाळेकडून आभार मानण्यात आले. यावेळी श्री गुरुदत्त शुगर चे सिक्युरिटी ऑफिसर मा.शामराव पाटील साहेब तसेच



सी.डी. पाटील साहेब, मयूर खोत, बंडू भोरे, शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षिका ,विद्यार्थी उपस्थित होते.

## कळंब शहरात वृक्षमय वातावरण ११११११ वृक्षाची एकाच वेळी लागवड

उस्मानाबाद/प्रतिनिधी : हरित कळंब ही संकल्पना घेऊन पोलीस व सकल कळमकर नागरिकांच्या वतीने व वृक्ष संवर्धन समितीच्या माध्यमातून कळंब व परिसरात ११११११ वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यात आला होता. यानुसार दि. ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी वृक्ष लागवडी सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे प्रमुख कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी, तुळजापूरचे आमदार राणा जगजीतसिंह पाटील, कळंब -उस्मानाबाद मतदार संघाचे आमदार कैलास घाडगे पाटील, नॅशनल शुगरचे चेअरमन बी. व्ही ठोंबरे, धनेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष डॉ, प्रतापसिंह पाटील, कार्यक्रमाचे प्रवर्तक सहाय्यक पोलीस अधीक्षक एम रमेश, कळंब चे पोलीस निरीक्षक सुरेश साबळे, नगरपरिषद मुख्याधिकारी शैला डाके, जिल्हाधिकारी सचिन ओंबासे यांच्या पत्नी अस्मिता ओंबासे, जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी यांच्या पत्नी महिमा कुलकर्णी, यांची प्रमुख उपस्थित होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यानंतर सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी राष्ट्रगीत गायन करण्यात आले. व वृक्षारोपण कार्यक्रमास सुरुवात झाली. उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या प्रसंगी उपस्थित प्रमुख यांनी जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी जिल्ह्यात वृक्ष मोहीम राबवत आहेत याबद्दल गौरव उद्गार काढले. तर कळंब शहर व परिसरात सहाय्यक पोलीस अधीक्षक एम रमेश यांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी केलेली नियोजन व कार्य स्तुत्य असल्याचे सांगितले. सकाळपासून वृक्ष लागवडीसाठी धावपळ सुरू होती. सा. साक्षी पाहून ज्योत परिवार, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर मल्टीस्टेट, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,भैरवनाथ अध्यापक विद्यालय, विद्या भवन हायस्कूल, सावित्रीबाई फुले विद्यालय, विविध शाळा, महाविद्यालय, सामाजिक संस्था, पंचायत समिती कार्यालय, न्यायालय, नगरपरिषद कार्यालय अधिकारी व कर्मचारी तसेच कळंब तालुका पत्रकार संघ, महादेव मंदिर, खंडोबा मंदिर,संत रोहिदास महाराज मंदिर, सर्व मिळून ४० किलोमीटर रस्त्याचा दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आले. विद्या भवन हायस्कूल च्या वतीने मुख्याध्यापक व्ही एस पवार, उपमुख्याध्यापिका एस.डी खोसे/पाटील, सह सर्व कर्मचाऱ्यांनी वृक्षारोपणामध्ये भाग घेतला. कळंब न्यायालय न्यायाधीश माननीय निनाद अशोक इंगळे, कळम न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती रवींद्र बाटे, न्यायमूर्ती मोहसीन शेख, यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वकील संघाचे एड,दत्ता पवार, एड, प्रवीण यादव, एड, एस.एम जाधवर, एड, त्र्यंबक मनगिरे, एड, अशोक चोंदे,बंडू कोळपे, सा. साक्षी पावनज्योतच्या कायदेशीर सल्लागार एड, शकुंतला फाटक, सरकारी वकील एड,अभय गवळी यांनी या वृक्षारोपण मोहिमेत सहभाग घेतला. यावेळी शिक्षण महर्षी मोहेकर महाविद्यालयात



डॉ.अशोकराव मोहेकर, प्राचार्य,डॉ. सुनील पवार, व सर्व स्टाफ, बहुजनांच्या न्याय हक्कासाठी व शिक्षण महर्षी ज्ञानदेव गुरुजींच्या मोहेकर गुरुजींच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रकाशित होणाऱ्या सा.साक्षी पावन ज्योत, परिवाराच्यावतीने.अभूत पूर्व वृक्षारोपण कार्यक्रमात मुख्य संपादक सुभाष घोडके, डी.के कुलकर्णी, उपसंपादक माधवसिंग राजपूत, उपसंपादक अरविंद शिंदे, विशेष प्रतिनिधी राजाभाऊ बारगुले, भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य सतीश मातने, प्रा. श्रीकांत पवार, प्रा.महेश पवार, सुरज भांडे, सागर पालके, विनोद जाधव, आदित्य गायकवाड,नागेंद्र राऊत, कार्यकारी संपादक प्रा.अविनाश घोडके आदी सहभागी झाले होते.

पंचायत समितीचे गट विकास अधिकारी चकोर व स्टाफ, यासाठी हेल्दी ग्रुप, ज्येष्ठ नागरिक महासंघ, रोटरी क्लब ऑफ कळंब,सिटी एहसास ग्रुप, यांचा सक्रिय सहभाग होता. पर्याय संस्था हासेगाव यांच्या वतीने हासेगाव रोड तांदुळवाडी रोड येथे वृक्षारोपण कार्यक्रमात २५ गावातील महिलांनी संस्थेचे प्रमुख विश्वनाथ तोडकर,तसेच सामाजिक कार्यकर्ते वाघ यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमात कळंब तालुका वृक्ष संवर्धन समितीचे विलास पाटील, संजय देवडा, आनंद बलाई, महादेव महाराज अडसूळ, प्रकाश भडंगे, ज्योती सपाटे, बंडू ताटे, देश पांचाळ, रवी नरहिरे, सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनाक्षी भवर, प्रतिभा भवर यांचा सत्कार करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे वृक्ष वाटप स्टॉल लावण्यात आला होता. तर कळंब पोलीस स्टेशन येथून शेतकरी अनेकांनी शेतात आपल्या घरासमोर लावण्यासाठी वृक्ष रोपे वाटप करण्यात आली. तसेच कळंब शहरातील प्रसिद्ध गायक वहाब बागवान यांनी राष्ट्रभक्तीपर गीते गायन केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य जगदीश गवळी यांनी केले. या कार्यक्रमात प्रा. बाळकृष्ण भवर, शिक्षक संघटनेचे बाळकृष्ण तांबारे,दिलीप पाटील, माधवसिंग राजपूत, बाळासाहेब कथले, यश सुराणा, भाऊसाहेब शिंदे सचिन डोरले यांनी सहाय्य केले.

## जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय कोल्हापूर कडून निधी

### श्री गुरुदत्त शुगर्सचे मोलाचे योगदान

टाकळीवाडी/नामदेव निर्मळे: टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील सैनिक वेल्फेअर असोसिएशन टाकळीवाडी यांनी कारगिल विजय दिवस निमित्त वृक्षारोपणाचा जो कार्यक्रम राबिवलेला होता.त्यामध्ये गावातील सर्व ग्रामस्थ, हायस्कूल




शाळेचे शिक्षक , विद्यार्थी, सर्व आजी माजी सैनिक, व परीवार यांनी खूप मोठे योगदान दिले आहे.

वृक्षारोपण कॉम्पिटिशनमध्ये संघटनेने कोल्हापूर जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक ची पारितोषक २०००० /- रुपये सैनिक कल्याण सह अधिकारी श्री अशोक पवार साहेब यांच्या हस्ते संघटनेचे संस्थापक रमेश निर्मळे व अध्यक्ष दादा खोत यांनी स्वीकारले आहे. त्याबद्दल सर्वांना खूप खूप अभिनंदन, समीरा अरकाटे साहेब यांच्या संकल्पनेतून व सुरेश बदामे साहेब यांनी रोपे मिळवून देण्यासाठी मदत केली.

तसेच श्री गुरुदत्त शुगर्स लि,यांचेकडून गउइ ची मदत मिळाली.तसेच गावातील तंटा मुक्त अध्यक्ष केंदबा कांबळे, गोपाल निर्मळे, सुदर्शन शिरगुप्पे,महादेव बदामे ,नंदु कांबळे, विशेष म्हणजे लक्ष्मण निर्मळे यांचे १३ ऑपरेशन होऊन सुद्धा खूप चांगले योगदान दिले. सेवारत सैनिक सुट्टीवर असताना राहुल खानिकुडे व प्रवीण पाटील यांनी सुद्धा योगदान दिले. टेम्पो ड्रायव्हर कृष्णा बदामे, सर्व सैनिक परीवार मदतीने मराठी शाळा, हायस्कूल, स्मशान भूमी, व रोड वरती रोपे लावली. संघटनेच्या सर्व आजी माजी सैनिक व परीवार व सर्व ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य या सर्वांचे कौतुक होत आहे.

# म.न.पा.शाळेस साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नांव द्या; दलित स्वयंसेवक संघाची मागणी




सोलापूर /प्रतिनिधी : साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०३व्या जयंती निमित्त सो.म.पा.शाळा क्र.२७ येथे अमोल पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध खेळांच्या साहित्यांचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी शिवसेना जिल्हाप्रमुख अमोलबापू शिंदे व अमोल पोटफोडे यांच्या हस्ते अण्णाभाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी डॉ.किरण देशमुख, सुर्यकांत केंदळे,नाना मोरे,ॲड.शैलेश पोटफोडे,डॉ.अतिश पोटफोडे, राहुल पोटफोडे, डॉ.सागर डोलारे,महेश भिसे बाबा शेख,प्रविण अलकुंटे यांची प्रमुख उपस्थिती होती. अण्णाभाऊनां अभिवादन करताना अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.तसेच शाळेतील अस्मीत डकरे,झोया शेख, आयेशा शेख या लहान मुलांनीही आपले विचार व्यक्त केले.शेवटी शाळेचे शिक्षक बाळासो जगताप यांनी मान्यवरांचे आभार मानले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन देविदास खंडाळे यांनी केले.सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सुखवास डकरे,अमोल केंदळे, भूषण रोकडे, विजय भागरे, गणेश मगुमखाणे,महादेव खुडे,महेश धावडे,अमर खुडे यांच्यासह मुख्याध्यापिका अर्चना नवले, श्रीमती शीतल पवार, श्रीमती शुभांगी चौगुले, सिद्धवाडकर, पवार, शेख, सुंदर जाधव, मंदाकिनी जाधव,कोमल सावंत या शाळेच्या शिक्षिका व कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### मनपाच्या २७ नंबर शाळेला साहित्यरत्न अण्णाभाऊंचे नाव देऊ : अमोल बापू शिंदे यांची ग्वाही

दलित स्वयंसेवक संघाच्या वतीने या शाळेस साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव द्यावे असे निवेदन करण्यात आले.यासंदर्भात बोलताना अमोल बापू शिंदे यांनी असे आश्वासन दिले की शाळेतील फिव्हर ब्लॉक, संरक्षक भिंत, पाण्याची व्यवस्था, मैदान सुशोभीकरण यासाठी आवश्यक विशेष निधी उपलब्ध करून देऊ व शाळेस साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्याचे आश्वासन दिले .



# कोळी महासंघाच्या वतीने पदाधिकारी समाजबांधव व इतरांसाठी झाले वनभोजन

अक्कलकोट/प्रतिनिधीः आज रविवार दिनांक ६ ऑगस्ट २३ रोजी अक्कलकोट येथे सोलापूर जिल्हा कोळी महासंघ व अरूणभाऊ लोणारी(कोळी)बंधू मित्रपरिवार सामाजिक संस्थेच्या वतीने कोळी महासंघ पदाधिकारी, समाज बांधव मित्रपरिवार सह वनभोजन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते, यावेळी कोळी महासंघाचे सर्व पदाधिकारी समाज बांधव मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी श्री अंबादास सुणगार साहेब(सहाय्यक पोलीस निरीक्षक) या पदावर सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा कोळी महासंघाच्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच भंडारकवटाचे नेते श्री दरेप्पा(बापू) कमळे व दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष पदी श्री चंद्रकांत कमळे यांची निवड झाल्याने त्यांचाही सत्कार करण्यात आल यावेळी कोळी महासंघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रमुख अरूणभाऊ लोणारी,जिल्हाध्यक्ष संतोष पाटील, अक्कलकोट तालुका कोळी महासंघ नेतेगण पदाधिकारी समाज बांधव मित्रपरिवार उपस्थित

# आरक्षणाचा मुद्दा निवडणुकीसाठी वापरू नये छत्रपती संभाजी राजे

पंढरपूर/प्रतिनिधीः आगामी निवडणुकीत कोणत्याही राजकीय पक्षांनी आरक्षण हा मुद्दा वापरणे असे मत छत्रपती संभाजी राजे यांनी पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे व्यक्त केले पाहत आहेत विकास सोडून इतरांच्या गोष्टीवर पुढारी टीका करीत आहेत असे छत्रपती संभाजी राजे म्हणाले यावेळी स्वराज्याची पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते ते म्हणाले सध्या कोण कुठे आहे हे काहीच कळत नाही संघटनेची स्थापना झाल्यापासून राज्यात फिरत आहे अस्थिर वातावरण पाहून लोकांना आमच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत स्वराज्य संघटना शेवटचा घटक पर्यंत पोचवण्याचे हेच आमचे ध्येय आहे २०२४ मध्ये निवडणुकीत उतरू असे ते म्हणाले

राजकारणाची पातळी खालच्या स्तरावर आली असून लोक स्वराज्य कडे पर्याय म्हणून पहात आहेत विकास सोडून इतर गोष्टीवर पुढारी टीका करीत आहेत असे छत्रपती संभाजी राजे म्हणाले यावेळी स्वराज्याचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष श्री महादेव तळेकर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते



# प्रथम वर्ष इंजिनिअरिंगच्या कॅप राऊंड-३ चे ऑप्शन्स भरण्याची प्रकिया दि. ०८ ऑगस्ट पासून




पंढरपूर/प्रतिनिधीः 'शै.वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेशाच्या पहिल्या व दुसऱ्या फेरीचा विचार केला असता नेहमीप्रमाणे या ही वर्षी स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला विद्यार्थी व पालकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. विद्यार्थी व पालकांनी स्वेरीतील विद्यार्थ्यांचे वार्षिक परीक्षांचे निकाल, कॅम्पस प्लेसमेंट मधून निवड होणाऱ्या विद्यार्थांची वाढती संख्या, शैक्षणिक व संशोधनाचे वातावरण, मिळालेली मानांकने, उपलब्ध सोयी-सुविधा, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग या गोष्टींचा प्रामुख्याने विचार केलेला दिसत आहे. एकूणच 'स्वेरीत प्रवेश मिळणे ही काळाची गरज असल्याचे पालकांनी व विद्यार्थ्यांनी पूर्णपणे ओळखले आहे हेच दिसून येते.' असे प्रतिपादन अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांनी केले.

स्वेरीत पहिल्या कॅप राऊंड नंतर फारशा जागा शिल्लक राहत नाहीत हा इतिहास आहे. याच पार्श्वभूमीवर स्वेरीच्या पदवी अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले. 'शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंग प्रवेशाची तिसरी फेरी (थर्ड कॅप राऊंड) चे ऑप्शन फॉर्म भरण्याची प्रक्रिया येत्या मंगळवार, दि.०८ पासून ते गुरुवार, दि.१० ऑगस्ट २०२३ हे तीन दिवस चालणार आहे. या तिसऱ्या प्रवेश फेरीची अलॉटमेंट यादी अधिकृत संकेतस्थळावर शनिवार, दि. १२ ऑगस्ट २०२३ रोजी प्रसिद्ध होणार आहे. ज्यांना पहिल्या व दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळाला नाही व ज्यांनी पहिल्या फेरीत व दुसऱ्या फेरीत नॉट फ्रीझ/ बेटरमेन्ट केले आहे त्यांना या तिसऱ्या व अंतिम फेरीचा लाभ घेता येणार आहे.' अशी माहीती अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांनी दिली. सन २०२३-२४च्या पदवी अभियांत्रिकीच्या प्रवेशाकरीता यापूर्वीच ऑनलाईन रजिस्ट्रेशन फॉर्म भरणे, भरलेले अर्ज स्विकारुन कागदपत्रांची तपासणी, पडताळणी, अर्ज निश्चित करणे आदी प्रक्रियानंतर पहिल्या व दुसऱ्या प्रवेश फेरीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मागील दोन्ही फेरीत योग्य महाविद्यालय अथवा योग्य ब्रँच मिळाली नसेल अथवा कुठेच प्रवेश मिळाला नसेल अशा विद्यार्थ्यांसाठी आता ही शेवटची संधी आहे. त्यामुळे योग्य महाविद्यालय व योग्य अभ्यासक्रम (विभाग) याबाबतचे पसंतीक्रम ऑनलाईन भरावे लागणार आहेत. यासाठी मागे झालेल्या चूका टाळून व कट ऑफ चा पूर्णपणे अभ्यास करून कॅप राऊंड-३ चे ऑप्शन फॉर्म भरणे अत्यंत आवश्यक आहे. 'पालक व विद्यार्थ्यांनी महाविद्यालय निवडताना महाविद्यालयात दरवर्षी होणारे प्रवेश, विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल, कॅम्पस प्लेसमेंटची संख्या, कॅम्पस मधून मिळणारे संस्कार, शैक्षणिक वातावरण, सोयी-सुविधा, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग या बाबींचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यास करून करिअरच्या दृष्टीने योग्य महाविद्यालयाची निवड करणे अत्यंत गरजेचे आहे. तिसऱ्या प्रवेश फेरीचे जागावाटप (अलॉटमेंट) शनिवार, दि.१२ ऑगस्ट २०२३ रोजी प्रदर्शित केले जाणार आहे. यानंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन रविवार, दि.१३ ऑगस्ट ते बुधवार, दि.१६ ऑगस्ट २०२३ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरून प्रवेशाची निश्चिती करावी लागेल. स्वेरी अभियांत्रिकीच्या फॅसिलिटेशन सेंटर (एफ.सी.क्रमांक-६२२०) मध्ये ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची मोफत सोय केली असून प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंगच्या प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील (९५९५९२११५४) व प्रा.उत्तम अनुसे (९१६८६५५३६५) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली उच्च शिक्षित प्राध्यापक वर्गाच्या सहकार्याने नव्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी स्वेरी महाविद्यालय सज्ज आहे.




# चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कौठाळी गावचा आदर्श

## कौठाळी येथील अँड.डी.एस.पाटील यांच्या ग्रुपच्या वतीने २५० महिलांना तीर्थक्षेत्र दर्शन सहलीचे आयोजन

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सह.साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पंढरपूर तसेच मंगळवेढ्यात ठिकठिकाणी सामाजिक उपक्रम घेतले. त्यातच कौठाळीचे युवा नेते ॲड.श्री.डी.एस. पाटील व यांच्या ग्रुपच्यावतीने २५०महिलांना तीर्थक्षेत्र यात्रा सहल काढण्यात आली.

तीन वर्षातून एकदा येणारा अधिक मास हा भाविकांसाठी पर्वकाळ मानला जातो. श्री क्षेत्र आळंदी, देहू, प्रति बालाजी व शिखर शिंगणापूर या धार्मिक स्थळांचे देवदर्शन करण्यासाठी महिलांची तीर्थयात्रा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये गावातील साधारण २५० कुटूंबातील माता भगिनींना देवदर्शन घडले. दरम्यान होणारा प्रवास, भोजन इत्यादी सर्व खर्च डी.एस.पी. ग्रुपच्या वतीने करण्यात आला.

यापूर्वीही डीएसपी ग्रुपचे वतीने अनेक प्रकारचे सामाजिक उपक्रम राबविलेले असून अशाप्रकारच्या सहलीचा उपक्रम तालुक्यात पाहिलाच असल्यामुळे त्याचे सर्व स्तरामधून कौतुक होत आहे. देवदर्शनाला निघण्यापूर्वी कौठाळी येथील भैरवनाथ चौकामध्ये श्री विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांचा वाढदिवस साजरा करून प्रवासासाठी निघणाऱ्या ट्रॅव्हल्स व वाहनाचे पूजन अभिजीत आबा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी विधी सेलचे तालुकाध्यक्ष अँड.दत्तात्रय पाटील, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष मोहन पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य प्रकाश पाटील ,लोणारी समाजाचे तालुकाध्यक्ष सागर गोडसे, विठ्ठल पाटील, महादेव इंगळे, नामदेव लेंडवे ,अनिल नागटिळक, अण्णासाहेब पाटील ,नवनाथ लेंडवे, समाधान नागटिळक, बाळकृष्ण नागटिळक, भैय्या पाटील, तानाजी धुमाळ, दामोदर इंगोले, अमोल अटकळे, अधिक भोसले, ग्रा.सदस्य सोमनाथ लोखंडे ,निलेश वाघमोडे, नितीन जाधव ,अनिल लवटे, प्रशांत कोरके, नितीन नागटिळक, शांताराम नागटिळक, नागनाथ नागटिळक ग्रा.सदस्य सौ.यशश्री पाटील पोलिस पाटील सौ. माधुरी नागटिळक आदीसह डीएसपी ग्रुपचे कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते

कौठाळी गाव हे माझे कुटुंब असून गावातील सर्व नागारिक माझ्या कुटुंबांतील सदस्य आहेत त्यांना देवदर्शनाला घेऊन जाणे आमचे कर्तव्य असल्यामुळे डीएसपी ग्रुपच्या वतीने तीर्थयात्रेचे आयोजन केले होते त्यामुळे माता भगिनींची सेवा करण्याचे भाग्य लाभले व येथून पुढेही लाभावे अशी भावना अँड.पाटील यांनी व्यक्त केली. **-ॲड.दत्तात्रय पाटील (ग्रा पं. सदस्य, कौठाळी)**

कौटुंबिक जबाबदाऱ्यात व्यस्त असणाऱ्या माता-भगिनींना आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने कौठाळी येथील ॲड दत्तात्रय पाटील यांच्या ग्रुप च्या वतीने देवदर्शन घडावी ही भावनाच विलक्षण समाधान देणारी आहे वाढदिवशी अनेकांचे देवदर्शन व्हावे याहून पुण्याचे काम काय असू शकते अतिशय कल्पकतेने व सद्भावनेने दिलेली ही वाढदिवसाची अनोखी भेट मनाला भावली असून सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणारी असल्याने दर्शनासाठी गेलेल्या महिलांसाठी समाधान देणारी आहे.

**- अभिजीत पाटील,**
**चेअरमन श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना**

# माळशिरस तालुक्यासाठी पाच कोटींचा निधी मंजूर



नातेपुते/प्रतिनिधी : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजने अंतर्गत माळशिरस तालुक्यातील ३५ गावांना विविध विकास कामांसाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याने या गावातील सभागृह बांधणे, रस्ता तयार करणे, सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे, ड्युअल सौर पंप बसविणे, सभामंडप सुशोभीकरण करणे, सौर दिवे बसविणे, मंदिरासमोर सभा मंडप बांधणे, वाचनालय आदी विविध विकास कामे होणार असल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त केले जात आहे .यामध्ये रस्ते कामासाठी झिंजेवस्ती, विझोरी, चाकोरे, गोरडवाडी, शिंगोर्णी, दत्तनगर खंडाळी, सुळेवाडी, मगरवाडी, दहिगाव, काळमवाडी, बचेरी, कण्हेर या गावांसाठी १ कोटी २० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सभागृहासाठी गारवाड, कचरेवाडी, मळोली, कोथळे, गुरसाळे ५० लाख. सभा मंडप बाभूळगाव, धर्मपुरी जळभावी, विजयवाडी, फोंडशिरस, फडतरी, उंबरे दहिगाव, मांडवे, डोंबाळवाडी खु, मोरोची, धानोरे, पठाणवस्ती, जाधववाडी, तांबेवाडी, दहिगाव, कोंडबावी, सदाशिवनगर १ कोटी ७० लाख. सुशोभीकरण मोटेवाडी मा. तरंगफळ, भांब, माळशिरस ९० लाख. सौरदिवे मानकी पिंपरी कोळेगाव, कोथळे, नातेपुते, कारूंडे ६० लाख. स्वच्छतागृह तिरखंडी १० लाख असा एकूण पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे .

# वैतागलेल्या प्रवाश्यांनी एसटीच अडवली.. अर्धा तास वाहतुकीचा नाट्यमय खोळंबा..




वेळापूर / प्रतिनिधी : सद्या अधिक महिना सुरू आहे, त्यामुळे पंढरपूर कडे जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे, त्यातच शिंदे फडणवीस सरकारने महिलांना एस टी चा प्रवास निम्मे तिकीट करून खूप चांगले पाऊल उचलले आहे. एस टी च्या प्रवाशांमध्ये महिलांची संख्या लक्षणीय वाढली आहे. वेळापूर हे ठिकाण पुणे पंढरपूर या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावरील महत्त्वाचे आणि चौकाचे गाव आहे. या मार्गावरून अकलूजहून पंढरपूर आणि सोलापूरकडे तसेच सांगोला, व पुण्याकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असते.

वेळापूर येथील बस स्टँड समोर नवीन उड्डाणपुलाचे काम सुरू आहे, गेली वर्षभर झालं हे काम रखडले आहे, एकाच बाजूने दोन्हीकडील वाहतूक सुरू असते, प्रवाशांची अगोदरच गैरसोय आहे, शालेय विद्यार्थिनी व महिला प्रवाशांचे तर प्रचंड हाल होतात, तात्पुरते बस स्टॉप शेड सावलीसाठी अपुरे आहे, महिलांना शौचालयाची कसलीही सोय नाही. त्यामुळे अगोदरच प्रचंड हाल सहन करत असलेले प्रवासी सध्या याठिकाणी पुण्याहून आलेल्या बस गर्दीमुळे थांबत नाहीत त्यामुळे वैतागलेले असतात.

गेल्या वर्षभर होणाऱ्या त्रासाचा उद्रेक काल प्रवाश्यांमधून पाहायला मिळाला, दीड ते दोन तास ताटकळत उभे राहूनही एस टी थांबत नाही म्हणून प्रवाश्यानी राजगुरू नगर आगाराची पंढरपूर कडे निघालेली बस रस्त्यावर अर्धा तास अडवून ठेवली. त्यामुळे दोन्ही बाजूला जवळपास दोन ते तीन किलोमीटर वाहतूक ठप्प झाली. अर्ध्या तासानंतर वेळापूर पोलिसांनी प्रवासी बांधवांची समजूत घालून वाहतुकीस मार्ग मोकळा करून दिला.

पंढरपूर व अकलूज आगार व्यवस्थापकाकडे वारंवार तक्रार करूनही ज्यादा गाड्या सोडल्या जात नाहीत असा लोकांचा तक्रारीचा सूर पाहायला मिळत होता. या प्रकाराकडे संबंधित आगार व्यवस्थापक यांनी तातडीने लक्ष घालून प्रवाश्यांच्या सोयीचा मार्ग काढावा अशी मागणी प्रवासी बांधव करत आहेत.